| | | | |
|---|---|---|---|
| | The Handmaid's Tale | | |
| 20 | Achievement Motivation of Day and Night College Students | Dr. G. V. Lokhande | 95 |
| 21 | Anxiety level of professional college girls and non-professional college girls | Prof. Dr. S. H. Mohite | 98 |
| 22 | Women entrepreneurs at global: with reference to India | Ms. S. R. Lokhande | 102 |
| 23 | Women Empowerment Through Rural Development in karnataka (With Special Reference to Ramanagara District) | Srinivasa B. S. Siddappa M. | 107 |
| 24 | Women's empowerment in India: miles to go | Rubina Shertate Mahebob Khan Pathan | 113 |
| 25 | Women's Rights of Inheritance and empowerment | Prof. M. S. Mittha | 117 |
| 26 | महिला सबलीकरणात बचत गटांची भूमिका | डॉ. महादेव सदाशिव डिसले | 121 |
| 27 | दलित कवितेतील स्त्री | प्रा. डॉ. बिरा पारसे | 126 |
| 28 | महिला सबलीकरणाची दिषा: सद्यस्थिती | प्रा. विजयश्री विठ्ठल गवळी | 129 |
| 29 | महिला सबलीकरण: वास्तव आणि काळाची गरज | श्रीमती सारिका कल्याण विधाते | 134 |
| 30 | मानवी हक्क आणि महिलांचा विकास | सुनिल कल्याण विधाते | 138 |
| 31 | 'स्व संरक्षण हेच आरक्षण' रुजवणूकीसाठी विविध उपक्रमांचे प्रषिक्षण—एक अभ्यास | डॉ.राठोड लाजवंती ईष्वरलाल, | 141 |
| 32 | भारतीय स्त्री आणि शिक्षण | बी. डी. गोरे | 146 |
| 33 | अहमदनगर जिल्हयातील लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास: विषेश संदर्भ २००१ व २०११ | रहाणे अषोक भाऊसाहेब | 150 |
| 34 | स्वयंसहाय्यता बचतगट आणि महिला सक्षमीकरण | प्रा. डॉ.सुरेखा वैजनाथराव दाडगे | 153 |
| 35 | महिला सक्षमीकरण व शासकीय योजना — एक दृष्टिक्षेप | प्रा.डॉ.सीमा रविंद्र चव्हाण, | 157 |
| 36 | आजच्या स्थितीतील महिलांचे सबलीकरण आणि सक्षमीकरण आवष्यक आहे | श्रीमती पाटील सविता वसंतराव | 160 |
| 37 | Violence against Women and Girls महिला आणि मुलींविरोधात हिंसाचार | श्री दत्तात्रय विष्वंभर जाधव प्रा. डॉ. महेश मोटे | 166 |
| 38 | नाषिक मधील स्त्री षिक्षणातील षांताबाई दाणी यांचे योगदान | प्रा. सुर्यवंषी संजय एस. प्रा.विघे सोमनाथ एस | 169 |
| 39 | पारधी जमातीच्या महिलांचे जीवनमान आणि लिंगभाव विषमता | प्रा. ईष्वर लक्ष्मण राठोड | 172 |
| 40 | आजच्या बदलत्या परिस्थितीत महिलांनी कसे असावे | प्रा. काटकर तात्यासाहेब शिवाजी | 175 |
| 41 | आर्थिकदृष्टया कमजोरामध्येकौशल्य विकसन | प्राचार्या डॉ. पांढरे विदयुलता | 178 |




Scanned with OKEN Scanner

# पारधी जमातीच्या महिलांचे जीवनमान आणि लिंगभाव विषमता

प्रा. ईष्वर लक्ष्मण राठोड
समाजषास्त्र विभाग प्रमुख, षि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब जि. उस्मानाबाद.

**प्रस्तावना :**

परिघाच्या बाहेर असलेल्या आणि आज परिघातून केंद्रस्थानी आणण्यास तयार असलेला समूह म्हणजे पारधी जमात. आजही या जमाती मध्ये पाहिजे ती प्रगती झालेली नाही आणि त्यातही पारधी जमातीच्या महिलांच्या बाबतीत अत्यंत वाईट परिस्थिती आहे. महिलांना षिक्षणापासून कोसो दूर ठेवण्यात आले तसेच महिलांचे अनेक प्रष्न आणि षोशण आजही कायम आहे तसेच आहेत. विशमता ही संकल्पना आर्थिक आणि सामाजिक दृश्टीने वापरली जाते. सामाजिक विशमता ही सार्वत्रिक स्वरुपात आढळून येते. सामाजिक विशमता समजून घेतांना दारिद्र्य, सधनता, मागासलेपणा, वंचितता, संसाधनांचे वितरण ह्यसारख्या घटकांचा आधार घ्यावा लागतो. तसेच सामाजिक गट, विषिश्ट देष, समाज, स्तर ह्यंचाही विचार करावा लागतो.

भारतात आणि विषेशतः महाराश्ट्रात पारधी जमातीचे प्राबल्य संपूर्ण जिल्हयात आढळून येते. पारधी जमातीचे सर्वाधिक संख्या उस्मानाबाद जिल्हयात आढळून येते. महाराश्ट्रामध्ये पारधी जमातीस अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आलेला आहे. महाराश्ट्र षासनाच्या इ.स. २००२ च्या अनु. जमातींच्या यादीमध्ये ही जमात ३८ व्या क्रमांकावर आहे. जिचे आडवीचिंचेर, फासं पारधी, फासे पारधी, लंगोटी पारधी, बहेलिया, बहेल्लिया, चिता पारधी, षिकारी पारधी, टाकणकार आणि टाकिया असे उपगट समाविश्ट आहेत. स्वातंत्र्याच्या ७० वर्शानंतर आजही ही जमात विपन्नावस्थेत जीवन जगत आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, षिक्षणाचा अभाव, अठराविष्वे दारिद्र्य, जंगली आणि भटके जीवन यामुळे प्राण्यांपेक्षाही खालच्या पातळीचे जीवन जगणाऱ्या या जमातीमध्ये देखील लिंगभाव विशमता आढळून येते. बहुतांष जमातीमध्ये लिंगभाव विशमता आढळत नसली तरी पारध्यांमध्ये ती प्रकर्शाने जाणवते. या जमातीमधील स्त्रीया ह्या पुरुशांच्या तुलनेत अत्यंत हिनदीन अवस्थेत जीवन जगत असून त्यांची व्यथा ही पारधी पुरुशांपेक्षा वेगळी आणि कितीतरी मोठी आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे :**

१. पारधी स्त्रीचा जीवन संघर्श जगापुढे मांडणे.
२. पारधी स्त्रियांवरील निर्बंध स्पश्ट करणे.
३. पारधी जमातीतील लिंगभाव विशमता स्पश्ट करणे.
४. पारधी स्त्रियांच्य समस्यांबाबत समाजमन जागृत करणे.

**गृहीतके :**

१. पारधी स्त्री हक्क आणि अधिकारांपासून वंचित आहे.
२. पारधी जमातीमध्ये लिंगभाव विशमता असल्याचे दिसून येते.
३. पारधी स्त्रीची व्यथा पुरुशांपेक्षा वेगळी आहे.

**संषोधन पध्दती :**

प्रस्तुत षोधनिबंधासाठी वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून माहितीचे स्त्रोत म्हणून संदर्भ ग्रंथ, मासिके आणि वृत्तपत्रांचा वापर करण्यात आला आहे.

**लिंगभाव विषमता म्हणजे काय?**

भारतीय समाजात पुर्वीपासून लिंगाच्या आधारे भेद केला जातो. पुरुशांसाठी असलेले अनेक प्रकारचे अधिकार, हक्क, स्वातंत्र्य आणि संधी स्त्रियांना उपभोगता येत नाही. भारतीय संविधानाच्या भाग तीन मधील अनुच्छेद १४ ते १८ नुसार समानता प्रस्थापित करण्यासाठी तरतुदी केल्या असल्या तरी प्रत्यक्षात लिंगभाव विशमता असल्याचे दिसून येते.

हक्क, अधिकार, स्वातंत्र्य आणि संधी उपभोगण्यासंदर्भात स्त्री पुरुशांमध्ये लिंगाच्या आधारे केलाजाणारा भेदभाव म्हणजेच लिंगभाव विशमता होय.



Scanned with OKEN Scanner

मॅक्स वेबर यांच्यामते, विशमता ही सत्ता आणि अधिकार यांच्या विकेंद्रीकरणातुन निर्माण होते. सत्ता प्राप्त करण्याच्या क्षमतेमुळे भांडवल, भूमी, बौध्दीक क्षमता, भौतिक षक्ती व सामाजिक प्रतिश्ठा यासारख्या सामाजिक संसाधनांवर नियंत्रण मिळविले जाते. पारधी स्त्री अभावग्रस्त आणि समस्याग्रस्त जीवनामध्ये नवऱ्याची निश्ठेने सोबत करित असली तरी तिच्यावर लिंगाच्या आधारे अनेक निर्बंध लादले असल्याचे दिसून येते. म्हणून पारधी जमातीत लिंगभाव विशमता आहे असे म्हणता येते.

**पारधी स्त्रीचा संघर्ष :**

षासनाची षिकारीवरील बंदी आणि अनेक पषुपक्ष्यांना राखीव घोशित केल्यामुळे उदरनिर्वाहासाठी अनेक पारधी चोऱ्या करतात. चोरी वाटमारी करुन अथवा षिकारीवरुन थकुन आलेल्या नवऱ्याची व घरातील लहान मुलांच्या अन्नाची व्यवस्था स्त्रीलाच करावी लागते. त्यासाठी ती षेजारीन किंवा लेकराला सोबत घेऊन गावोगाव दारोदार भीक मागून षिळेपाके अन्न गोळा करते. तान्ह्या लेकराला दिवसभर छातीषी बांधुन त्याच्याही भुकेचा प्रष्न सोडविते. काही स्त्रिया चुंबकाच्या सहाय्याने रस्त्यांवरील लोखंड (भंगार) गोळा करतात. काही कचऱ्यातुन उपयोगाच्या वस्तू षोधून त्या आधारे कुटूंबाचा चरितार्थ चालवितात. संपूर्ण जमात दरिद्री असल्यामुळे ती आयुश्यभर नवऱ्याच्या जंगली जीवनासोबत भिंगरीसारखी फिरत असते.

दिसायला सुंदर असल्यास टवाळखोरांच्या वाकड्या नजरा तिच्यावर पडतात. भटकंती, कमी वयात विवाह आणि दरिद्र्यमुळे तिला षिक्षण घेता येत नाही.पतीला जास्त दिवसांचा कारावास झाल्यास अथवा तो बेपत्ता झाल्यास वडिल तिचा दुसरा विवाह करुन देतो. तिथेही तिला मुले होतात. त्यामुळे पतीची वासनापुर्ती करणे, अनेक मुलांना जन्म देणे, जुणे कपडे मागणे, भीक मागणे आणि षेवटी मरणे हेच तिचे जीवनचक्र झाले आहे. एकूणच तह हयात तिला संघर्श करावा लागतो. नवऱ्याच्या गुन्ह्यसाठी अथवा गुन्हा नसतांना देखील पोलिसांचा अत्याचार सहन करावा लागतो.

**पारधी स्त्रीवरील निर्बंध :**

चोरी किंवा इतर कोणत्याही कारणाने खिषात पैसा आला किंवा आधीच्या बायकोचा तिटकारा आला तर तो पैषाच्या बळावर दुसरी बायको करतो. नवरा मुलगा मुलीच्या वडिलांना द्याज देऊन वधू प्राप्त करतो. बरेच वडिल मुलींना पैषासाठी अक्षरषः पैसेवाल्यांना विकतात. पैसेवाल्यांना नवऱ्याने टाकलेल्या व कुमारिका मुली देखील मिळतात. ४० वर्शाच्या माणसाला १३–१४ वर्शाची कुमारिका मिळते. तिची सवत तिथेच राहते किंवा दुसरा पती करते. तिथेही तिला मुले होतात. मग तिला मुलांना जन्म देणाऱ्या यंत्राचं आणि उपभोग्य वस्तूचं स्वरुप प्राप्त होते.

लग्नानंतरही मुलीवर पित्याचा अधिकार कायम राहतो. पतीचा कारावास किंवा बेपत्ता होणे अषा कारणास्तव वडिल तिला द्याजसाठी अनेक पुरुशांना विकू षकतो. पहिला पती परत आल्यास तो तिला परत घेऊन जाऊ षकतो. परंतू त्यापुर्वी त्याला दुसऱ्या पतीने दिलेले द्याज परत करावे लागते. या जमातीत स्त्रियांना गहाण ठेवण्याची देखील पध्दत आहे. त्यामुळे पारधी स्त्रीची फरफट होते.

स्त्रीदेह अपवित्र मानतात म्हणून कोणताही मुलगा आईच्या पाया पडत नाही. स्त्रीचा हात किंवा पाय डोक्याला लागू देत नाही. लागल्यास केस भादरतात. स्त्रीचा ताटाला पाय लागल्यास त्याला अग्निडाग देतात. स्त्रियांनी दावण ओलांडू नये, विहीर, नळ, हापषी किंवा पाण्याच्या स्त्रोता षेजारी कपडे धुवू नये. स्त्रियांनी पायाखालच्या दिषेने बसायचे पुरुशाच्या अंगावर सावली पडू द्यायची नाही. स्त्रियांनी उताराकडील बाजुने बसावे, लुगडे पुरुशाचा स्पर्ष होणार नाही किंवा तो खालुन जाणार नाही अषा ठिकाणी ठेवावे. पुरुशाने स्त्रीच्या अंथरुण पांघरुणाचा स्पर्ष होऊ द्यायचा नाही.

स्थळ पुजेच्या कार्यक्रमात स्त्रिया उपस्थित असतात परंतू त्यांचा कोणत्याच विधीत सहभाग नसतो. त्यांना गंगास्पर्ष वर्ज्य असतो. गंगेत उतरल्यास कपडे वर न करता तसेच भिजू द्यावे लागते. ते न पिळता अंगावरच वाळू द्यावे लागते. गंगेत हातपाय धुता येत नाही.

देवकार्यामध्ये देखील स्त्रियांचा कुठेच सहभाग नसतो. त्यांना विषिश्ट अंतरावर थांबावे लागते. देवीदेवतांची प्रतिश्ठापना केलेल्या जागेच्या पष्चिम दिषेला स्त्रियांनी जाऊ नये. देवकार्यात वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही चीज वस्तूला स्पर्ष करु नये. स्पर्ष झाल्यास ती वस्तू विटाळते. व देवकार्यात विघ्न येतात. अषी त्यांची समजुत आहे. स्त्रियांना देव ठेवलेल्या खोलीत प्रवेष नसतो.



Scanned with OKEN Scanner

या जमातीत मासिक पाळीचा विटाळ आठ दिवस, मुलाचा जन्म विटाळ ३ महिने आणि मुलीचा जन्म विटाळ साडे ३ महिने पाळतात. जन्म विटाळातुन पवित्र होण्यासाठी स्त्रिला ३ दिवस गोमुत्राने हात व डोके धुवावे लागते. तिच्या हातच्या भाकरी गायीला खाऊ घालतात. तिसऱ्या दिवषी स्नान करुन देवीची पुजा करुन स्वयंपाक करुन पाच सुवासिनी जेवू घातल्यानंतर जन्मविटाळ फिटतो.

स्त्रीचे पाऊल वाकडे पडले, तिला किंवा तिच्या कपड्यला परपुरुशाचा कळत किंवा नकळत स्पर्ष झाला तरी जात पंचायत स्त्रीलाच बहिश्कृत करते. एखाद्याकडून अनैतिक कृत्य घडले तर जात पंचायत कठोर दंड ठोठावते परंतू दंडाची रक्कम भरण्याची सोय नसल्यास आपली मुलगी, बायको किंवा दोघीही गहाण ठेवाव्या लागतात. त्यांचा गैरफायदा घेतला जातो. दंडाची रक्कम न आल्यास त्या तषाच बर्बाद होतात. म्हणजे पुरुशांचीही षिक्षा स्त्रियांनाच भोगावी लागते.

पतीसोबत पत्नीलाही जेलमध्ये कोंडले जाते. गरोदर असल्यास तेथेच अपत्याचा जन्म होतो. नवरा जेलमध्ये गेला की, जमानतीच्या पैपासाठी ती गहाण ठेवली जाते. तसेच मुलाबाळांच्या पालनपोशणाची जबाबदारी तिच्यावर येते. दसऱ्याला उत्साहात होणाऱ्या भवानी मातेच्या जत्रेमध्ये स्त्रीला अषुभ मानतात. जमातीत पितृसत्ताक कुटूंबपध्दती असून वडिलांच्या नावावरुन घराणे ओळखले जाते. लग्नानंतर मुलगी सासरी जाते. विधवेला आतेभावाषी लग्न करता येते. मावस किंवा मामेभावाषी लग्न करता येत नाही. पतीच्या मृत्युनंतर दिराषी लग्न करु षकते. भासऱ्याषी नाही. अपाप्रकारचे अनेक निर्बंध पारधी स्त्रीवर घालण्यात आले असून पुरुशाला मात्र सर्व प्रकारचे स्वातंत्र्य आहे.

**निष्कर्ष :**

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, पारधी जमातीमध्ये लिंगभाव विशमता आहे. लिंगाच्या आधारेच स्त्रियांवर अनेक बंधने लादली आहेत. पुरुश ज्या हक्क, अधिकार, स्वातंत्र्य आणि संधींचा उपभोग घेतात त्यापासून स्त्रियांना वंचित ठेवले आहे. पारध्यांमध्ये जे वेगवेगळे धार्मिक विधी, संस्कार होतात. त्यामध्ये स्त्रियांना कोणतेच स्थान नाही. स्थळपुजा, जलपुजा, देवकार्य (जवाहरनो) आणि विवाहामध्ये तिला कोणतेच हक्क आणि अधिकार असल्याचे दिसत नाही. तिच्या जीवनाचे सर्व अधिकार पित्याला (पुरुशाला) आहेत. जो जास्त द्याज देईल त्याच्याषी पिता तिचा विवाह करतो. द्याज न दिल्यास मुलीला परत आणून दुसऱ्या मुलाषी तिचा विवाह करु षकतो. या जमातीमध्ये पत्नीला गहाण **ठेवण्याचा** अधिकार पतीला आहे. जात पंचायतीमध्ये बहुतांषपणे स्त्रीलाच निरपराधित्व सिध्द करावे लागते. या **जमातीमध्ये** पतीने पत्नीला मारहाण करण्यास एकप्रकारे मान्यताच दिली आहे. मासिक पाळीमध्ये स्त्रीला अपवित्र **मानले** जाते. मुलगा वडिलांच्या पाया पडतो आईच्या नाही. जन्मदात्या आईला गौण स्थान दिले जाते. तिच्या **कपड्यला जरी** पुरुशाचा स्पर्ष झाला तरी तिलाच बहिश्कृत केले जाते.

अषाप्रकारे इतर अनुसूचित जमातींमध्ये लिंगभाव विशमता फारषी आढळत नसली तरी ती पारधी जमातीमध्ये प्रकशनि जाणवते. या विशमतेमुळे पारधी स्त्रीवर अनेक प्रकारचे अन्याय अत्याचार होतात. हक्क, अधिकार आणि संधी नाकारल्या जातात. पारधी जमातीची एकुणच स्थिती वाईट असून त्यातही पारधी स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामते कोणत्याही समाजाची प्रगती मोजायची असेल तर त्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करावे लागते. पारधी स्त्रीवर लक्ष केंद्रित केल्यास त्यांच्या जीवन स्थितीमध्ये फारसा बदल झाला असल्याचे दिसून येत नाही. म्हणून पारधी समाजाच्या समस्या सोडवितांना पारधी स्त्रियांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करावे लागते. तेव्हाच पारधी जमात विकासाच्या मुख्य प्रवाहात येऊ षकेल.

**संदर्भ :**

१. भारताचे संविधान, संचालक, मुद्रण व लेखनसामुग्री, महाराश्ट्र षासन यांनी भारतसरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाषीत केले २००६.
२. डहाके डॉ. वासुदेव, व्यथेची साजनी : पारधी स्त्री, दै. सकाळ दि. ३१.०१.२०१५.
३. राऊत एन.यु., महिला सुरक्षा एवं समाज, सत्यम पब्लिषर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, जयपूर प्र. आ. २०१३
४. चव्हाण रामनाथ, जाती आणि जमाती, मेहता पब्लिषींग हाऊस, पुणे, द्वि. आ. सप्टें.१९९०.
५. गारे डॉ. गोविंद, महाराश्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाषन पुणे, ४११०३० तृ. आ. २०१२.



Scanned with OKEN Scanner